# १. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना

सदरची योजना केंद्र शासन पुरस्कृत योजना असुन दिनांक १५ ऑगस्ट १९९५ पासून संपुर्ण महाराष्ट्रात कार्यान्वीत झालेली आहे. या योजनेमध्ये जे पात्र लाभार्थी संजय गांधी योजनेतील वय ६५ वर्ष पुर्ण झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेत सामावून घेतले जाते त्यानुसार लाभ देण्यात येतो.

# इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना

या योजनेमध्ये ग्रामीण भागाकरीता दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षणानुसार व शहरी भागासाठी नगर विकास विभागाने दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या घेतलेल्या सर्वेक्षणानुसार फक्त दारिद्र्या रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नांव असलेल्या ६५ व ६५ वर्षावरील निराधार स्त्रि व पुरुष व्यक्ती पात्र होतील.

**पात्रता व निकष** :- दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव असणे आवश्यक आहे.

**आर्थिक सहाय्य**:- या योजनेतंर्गत लाभार्थ्यांना
केंद्र शासनाकडुन रक्कम रु. २००/- प्रति लाभार्थी दरमहा
राज्य शासनाकडुन र. रु. ४००/-
असे एकुण ६००/- दरमहा प्रती
लाभार्थ्यास निवृत्तवेतनाचा लाभ मिळतो.

**आवश्यक कागदपत्रे** :- १. उत्पन्नाचा दाखला
२.रहिवास दाखला
३. वयाचा पुरावा